SIGMA®
ENGINEERED SOLUTIONS





# नैतिकतेसंबंधातील नियम व व्यावसायिक आचारसंहिता





sigmaengineeredsolutions.com



# सिग्माचे वैशिष्ट्य

ही कंपनी उच्च गुणवत्तेचे व अचूकपणे तयार केलेले सुटे भाग योग्य मोजमापानुसार आणि वेळेवर वितरित करणारी आहे, असा ग्राहकांना निरंतर विश्वास असतो.

## अनुक्रमणिका


परिचय ....... 3
सिग्मा कोण आहे? ....... 4
मदतीची अपेक्षा ....... 5
सूडभावना नाही ....... 6
कामाच्या ठिकाणी आरोग्य आणि सुरक्षिततेची जपणूक ....... 7
पर्यावरण रक्षण ....... 8
कामाच्या ठिकाणची हिंसा आणि द्रव्य पदार्थांचा दुरुपयोग ....... 9
भेदभावरहित वागणूक आणि मानवी हक्कांची जपणूक ....... 10
छळणुकीस प्रतिबंध ....... 11
लैंगिक छळ ....... 12
मक्तेदारीला विरोध आणि निकोप स्पर्धा ....... 13
गुणवत्तापूर्ण उत्पादने आणि सेवा ....... 14
भेटवस्तू, मनोरंजन, लाचखोरी व भ्रष्टाचाराला प्रतिबंध ....... 15
राजकीय आणि दबावाचे कृत्य ....... 17
कर्मचाऱ्यांचा खाजगीपणा ....... 18
आंतरराष्ट्रीय व्यापार नियंत्रण ....... 19
कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण ....... 20
सायबर जोखीम आणि जबाबदारीने संवाद साधणे ....... 21
गोपनीय माहिती व बौद्धिक संपदा ....... 23
हितसंबंधांमधील परस्परविरोध ....... 24
प्रत्येकाची जबाबदारी ....... 26
प्राप्ती आणि पोचपावती ....... 27

# परिचय

## 1982 मध्ये स्थापन झालेल्या सिग्मा इंजिनीयर्ड सोल्युशन्स या कंपनीची वाढ भारतातील एका कारखान्यापासून ते जगभरातील 17 कारखान्यांपर्यंत झाली आहे.

या कालावधीत, कमी विद्युतदाबावर चालणाऱ्या विद्युतउपकरणांचा लहानशा क्षेत्रातील पुरवठेदार ते उच्च अभियांत्रिकी कौशल्ये वापरून तयार केलेले साचे, यंत्राद्वारे तयार केलेले सुटे भाग आणि अचूकतेने केलेले धातूचे मुद्रांकन यांचा जागतिक पातळीवरील पुरवठेदार अशी प्रगती सिग्मा इंजिनीयर्ड सोल्युशन्सने साध्य केली आहे. या प्रवासादरम्यान हे नैतिकतेसंबंधातील नियम आणि व्यावसायिक आचारसंहिता तयार केली गेली. जगभरात कोठेही व्यवसाय करताना सिग्मा कंपनीचे कर्मचारी, अधिकारी, संचालक मंडळ, कंत्राटदार आणि व्यावसायिक सहयोगी यांच्याकडून जी अपेक्षा आहे, त्याची आधाररेखा याद्वारे मांडलेली आहे.

कामाच्या ठिकाणी दैनंदिन क्रियाकलाप करताना सामोरे जावे लागणाऱ्या प्रत्येक नीतिविषयक किंवा कायदेविषयक समस्येचे निर्णायक उत्तर यातून मिळेलच असे नाही, मात्र बहुतेकवेळा उपाय शोधण्याची दिशा मिळू शकेल. शंका असल्यास थांबावे आणि विचार करावा. योग्य निर्णय घेण्यासाठी आपल्या उत्तम न्यायबुद्धीचा उपयोग करावा. तसेच मार्गदर्शन आणि पाठबळासाठी मानव संसाधन विकास विभागाकडे (एचआर) जावे.




## आचारसंहिता समजून घेणे

ही नियमावली समजून घेण्यासाठी पुढील गोष्टींची मदत होईल.

- नीतिविषयक आणि कायदेविषयक अवघड प्रश्नांसाठी किंवा त्यांचा अर्थ लावण्यासाठी मदत वा मार्गदर्शन मागावे.
- अनैतिक किंवा बेकायदेशीर वर्तनाची शंका आल्यास ते योग्य मार्गाने वरिष्ठांपर्यंत पोचवावे.
- चुकीच्या वर्तनाचा पुरावा असल्यास तत्परतेने कृती करावी.
- किंचितसेही अयोग्य वर्तन टाळावे.

सिग्मासाठी विशिष्ट असा कायदा किंवा नियम किंवा धोरणविषयक मार्गदर्शन नसले तरीसुद्धा सिग्माचे कर्मचारी, अधिकारी, संचालक मंडळ, कंत्राटदार, सल्लागार, प्रतिनिधी आणि व्यावसायिक सहयोगी यांनी नीतिमत्तेने आणि ठोस व तर्कशुद्ध न्यायबुद्धीने वागावे, अशी अपेक्षा आहे. सिग्माचे काम अनेक देशांमध्ये चालते. काही वेळा स्थानिक नियम व कायदे आणि सिग्माची वर्तनपद्धती यांमध्ये विरोध असू शकतो. एखादी कायदेशीर गरज आणि कंपनीची वर्तनपद्धती यामध्ये विरोध किंवा फरक दिसून येईल, त्यावेळी कर्मचारी आणि इतर प्रतिनिधींनी, जे अधिक कडक मानक असेल, ते पाळावे.

नैतिकतेविषयीचे नियम आणि व्यावसायिक आचारसंहितेचे नियम यांवर पुनर्विचार करण्याचा आणि ते, सूचना देऊन किंवा सूचनेशिवाय, बदलण्याचा संपूर्ण अधिकार कंपनीकडे असेल. या जटिल आणि आव्हानात्मक जगात आपली विश्वासार्हता आणि प्रामाणिकपणा अधिक उंचावण्यासाठीचा प्रत्येक बदल कंपनीच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने केला जाईल.

# सिग्मा कोण आहे?

## आम्ही एक कृतिशील कंपनी आहोत.

एक अशी कंपनी, जी कधीही थांबत नाही किंवा 'जैसे थे' स्थिती राखण्यासाठी विश्रांती घेत नाही. जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी कौशल्य, अत्याधुनिक उत्पादन, काम करतानाच ते अचूकपणे करण्याची गुणवत्ता आणि जगभरात उत्तम दर्जाची ग्राहक सेवा या सर्वांची आमच्या नावाला साजेशी बेरीज करून आम्ही मूल्यनिर्मिती करतो. ग्राहकांना हवी तशी बिनचूक उत्पादने तयार केल्यावर त्यांना उत्तमतेकडे नेण्यासाठी काम करत सातत्याने सुधारणा आणि नवनिर्मिती करत राहण्याची आम्हाला आस आहे. एका अनुभवी विश्वासू भागीदाराकडून अपेक्षित असलेल्या निकडीच्या भावनेने आम्ही हे करतो.

कारण समस्या सोडवण्याची हीच पद्धत आहे.



### आमची दृष्टी

ग्राहकांची मर्यादपलीकडे अपेक्षापूर्ती करून जागतिक पातळीवरील प्रथम पसंतीचे भागीदार होणे.

### आमचे व्रत

जागतिक दर्जाची उत्पादने पुरवून ग्राहकांचे विश्वासू सहयोगी म्हणून आपले महत्त्व वाढवणे.

### सिग्मामध्ये अशा व्यक्तींची कदर केली जाते—

- ज्यांच्याकडे अनुकरणीय प्रामाणिकपणा आणि एकत्वाची भावना आहे.
- जे ग्राहकांवर लक्ष केंद्रित करतात.
- जे करत असलेल्या प्रत्येक कामामध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी धडपडतात.
- जे धाडसी आणि विश्वासार्ह आहेत.
- जे समूहात काम करताना बांधिलकी मानतात.
- जे सामाजिक आणि पर्यावरणाच्या दृष्टीने जबाबदारीने वागतात.
- जे सर्व सहयोगींच्या फायद्यासाठी हिरीरीने काम करतात.

SIGMA®
ENGINEERED SOLUTIONS

# मदतीची अपेक्षा

## कायदेशीर किंवा नैतिकदृष्ट्या चिंता वाटावी अशी परिस्थिती उद्भवल्यास त्याची माहिती सिग्मा व्यवस्थापनातील योग्य त्या अधिकाऱ्याला देण्यासाठी मुक्त वातावरण असावे.

बहुतेकवेळा, सुरुवातीला तुमच्या पर्यवेक्षकाशी किंवा व्यवस्थापकाशी बोलणे योग्य ठरते. अनेकदा त्यांना याचे प्रशिक्षण, अंतर्दृष्टी किंवा अनुभव असतो किंवा तुमच्या विशिष्ट चिंतेसाठी/समस्येसाठी कोणत्या व्यक्तीला भेटणे योग्य हे माहीत असण्याची शक्यता असते.

सिग्मा प्रत्येक निवेदनाकडे गंभीरपणे बघते आणि कुठलीही चिंतेची तक्रार, माहिती, ज्ञान यांबद्दल सखोल चौकशी करते. एवढेच नव्हे, तर सिग्मा प्रत्येक प्रश्नाला प्रतिसाद देते आणि चौकशीची गरज आहे का, याचे मूल्यमापन करते.

*संपूर्ण व निष्पक्ष तपासाचा अपवाद करता तुम्ही दिलेल्या सर्व माहितीची गोपनीय राखली जाते.*

### कायदेशीर किंवा नैतिक समस्या मांडण्यासाठीचे पर्याय

- तुमचे पर्यवेक्षक
- विशिष्ट धोरण किंवा प्रक्रियेअंतर्गत नियुक्ती करण्यात आलेला संपर्क
- मानव संसाधन विकास विभागातील (एचआर) तुमचा प्रतिनिधी
- सिग्मा/Navex रिपोर्टिंग पोर्टल
- ऑनलाइन sigmaengineered.ethicspoint.com
- दूरध्वनी (टोल फ्री):
  - **यूएस** – 022 5017 0544
  - जर तुम्ही संचालक असाल तर संचालक मंडळाच्या अध्यक्षांना किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सीईओ) माहिती द्यावी.



# सूडभावना नाही

**सिग्माला सातत्याने यश मिळत राहणे हे, जिथे आपली चिंता/काळजी/समस्या उघडपणे बोलून दाखवता येईल अशा, सूडाची भीती नसलेल्या वातावरणावर अवलंबून आहे.**

सिग्मा वाईट वर्तनाच्या प्रत्येक आरोपाकडे गंभीरपणे बघते आणि आपली चिंता/काळजी/समस्या प्रामाणिकपणे बोलून दाखवणाऱ्याविरुद्धच्या सूडभावनेला किंवा पक्षपाती वागणुकीला प्रतिबंध करते.

न्याय्य आणि निष्पक्ष चौकशी व्हावी यासाठी कंपनीला सहकार्य करणे आवश्यक आहे आणि कर्मचाऱ्यांसाठी ते अनिवार्य आहे. नैतिक किंवा परिपूर्ती प्रकरणाच्या संबंधातील चौकशीत सहकार्य केले म्हणून कोणाहीविषयी सूडभावना बाळगली जाणार नाही. नैतिक किंवा कायदेशीर चिंता/काळजी/समस्येविषयी माहिती उघड करणाऱ्याविषयी सूडभावनेने वागणाऱ्या व्यक्तीविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. त्या व्यक्तीला नोकरीतून काढून टाकण्यापर्यंतची कारवाई केली जाऊ शकते.



# कामाच्या ठिकाणी आरोग्य आणि सुरक्षिततेची जपणूक

**कामासंबंधातील सर्व दुखापती आणि आजार हे टाळता येण्याजोगे असतात यावर आमचा विश्वास आहे आणि आमच्या कामाच्या जागा सुरक्षित आणि आरोग्य जपणाऱ्या असाव्यात यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.**




### तुम्ही आवाज उठवला पाहिजे जर–

- कोणी तुम्हाला अशी कामगिरी पार पाडायला सांगत असेल, की जी तुम्हाला असुरक्षित वाटते किंवा जिच्यासाठीचे ज्ञान, साधने किंवा सुरक्षिततेची साधने तुमच्यापाशी नाहीत
- तुम्ही कोणाला एखादे काम असुरक्षित पद्धतीने करताना पाहिलेत किंवा वैयक्तिक सुरक्षिततेची साधने न वापरता करताना पाहिलेत
- कामाच्या ठिकाणी तुम्हाला असुरक्षित परिस्थिती दिसली किंवा तसा धोका जाणवला
- कामाच्या ठिकाणी एखादे वाहन किंवा उपकरण व्यवस्थित काम करत नसेल आणि ते असुरक्षित आहे असे वाटले

कामाच्या ठिकाणी घडणारी किंवा संबंधित असणारी कुठलीही घटना, दुखापत किंवा आजार यांची माहिती शक्य तितक्या लवकर तुमच्या सुपरव्हायझरला किंवा साइटवरील प्रक्रियापद्धतीनुसार सांगितलेल्या अधिकाऱ्याला द्यावी. साइटवरील सुरक्षितता पथक किंवा व्यवस्थापनाशी संपर्क करून तुम्हाला वाटणाऱ्या सुरक्षितता चिंतेविषयी किंवा समस्येविषयी तुम्ही बोलू शकता.

कामाचे ठिकाण सुरक्षित आणि दुखापतमुक्त करण्याची जबाबदारी सिग्माचे सर्व संचालक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर आहे.

# पर्यावरण रक्षण



**पर्यावरणाचे रक्षण करण्याची कामगिरी तसेच उत्पादन इत्यादी प्रत्येक काम पर्यावरणाच्या दृष्टीने जबाबदारीपूर्वक करण्याचे हे दायित्व गंभीरपणे निभावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

सिग्मामधील सर्व कामे पर्यावरणाच्या दृष्टीने जबाबदारीपूर्वक केली जावीत आणि समाजावर व पृथ्वीवर होणारे हानिकारक परिणाम कमी व्हावेत, यावर आमचा कटाक्ष आहे.

# कामाच्या ठिकाणची हिंसा आणि द्रव्य पदार्थांचा दुरुपयोग

**धमकावणे, प्रत्यक्ष हल्ला करणे किंवा हिंसेची धमकी देणे अशा प्रकारची कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा याविषयी सिग्माचे शून्य सहनशीलता धोरण आहे.**

जिथे कर्मचारी एकमेकांशी सभ्यतेने आणि आदराने वागतील आणि आपसातील मतभेद, अपमान न करता किंवा धमकी न देता व्यावसायिक पद्धतीने सोडवतील, अशा प्रकारचे कामाचे सुरक्षित वातावरण पुरवण्यासाठी सिग्मा प्रयत्नांची पराकाष्ठा करते.

कामाच्या ठिकाणची हिंसा प्रतिबंधित आहे. यामध्ये शारीरिक हिंसा किंवा त्याची धमकी यांचा समावेश आहे. परंतु यात छळ आणि दादागिरी यांसारख्या अपमानास्पद बोलण्याचा किंवा वागण्याचाही समावेश करता येतो. कामाच्या ठिकाणी किंवा कंपनीच्या वतीने कामावर असताना, परवाना असलेले किंवा विनापरवाना शस्त्र बाळगणे यास प्रतिबंध आहे. आपल्या वर्तनास आणि कामाच्या ठिकाणी किंवा बाहेर आपल्या वागण्याचा इतरांवर कसा परिणाम होतो, हे समजून घेण्यास आपणच जबाबदार आहोत.



कामाच्या ठिकाणी गुंगी आणणारी द्रव्ये व मद्य हाताळण्यास मनाई आहे. त्यांच्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षितता आणि आरोग्यसंबंधी गंभीर जोखमीचा धोका निर्माण होतो. कंपनीच्या आवारात किंवा कंपनीचे काम करत असताना कुठलेही बेकायदेशीर गुंगी आणणाऱ्या द्रव्याचे किंवा नियंत्रण असलेल्या पदार्थाचे सेवन, विक्री, बाळगणे, उत्पादन किंवा वितरण करण्यास बंदी आहे आणि असे केल्यास खटला गुदरला जाऊ शकतो. डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांच्या गैरवापराचाही यात समावेश आहे. अशा प्रकरणाच्या चौकशी आणि खटल्यादरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना सिग्माकडून सहकार्य केले जाईल.

तुम्हाला गुंगी आणणाऱ्या द्रव्याच्या वा मद्याच्या संबंधातील समस्या असल्यास साहाय्य मागावे. तुमच्यासाठी उपलब्ध असलेल्या उपक्रमांची माहिती घेण्यासाठी तुमच्या मानव संसाधन विकास अधिकाऱ्याशी संपर्क साधावा.

**अयोग्य वर्तणूक वाढत जाण्यापूर्वीच त्याबद्दल वरिष्ठांना सांगणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. जर आपण असे काही पाहिले, तर आपण त्याबद्दल बोलायला हवे.**

# भेदभावरहित वागणूक आणि मानवी हक्कांची जपणूक

**भेदभाव करणारे अपशब्द किंवा टिप्पणी, मस्करी, संदेश किंवा वर्तणूक यामुळे कामाचे वातावरण अपमान वा द्वेषाने गढूळ होते आणि ते वाढत जाते. हे मंजूर नाही आणि खपवून घेतले जाणार नाही.**

अर्जदार किंवा कर्मचारयांमध्ये संस्कृती, वंश, धर्म, लिंग, लैंगिक स्थिती, वय, अपंगत्व, वयज्येष्ठता किंवा लागू असलेल्या कायद्यान्वये संरक्षण दिली गेलेली श्रेणी यांच्या आधारे भेदभाव केल्यास सिग्मा ते खपवून घेणार नाही. भारत आणि मेक्सिकोसह जगातील अनेक देशांप्रमाणेच युएस सरकारनेसुद्धा लैंगिक कारणासाठी होणाऱ्या तस्करीसह सर्व प्रकारची मानवी तस्करी, लैंगिक क्रियांचा व्यापार, वेठबिगारांचा वापर, कर्मचारयांची नेमणूक करण्यासाठीच्या अयोग्य पद्धती, कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यासाठी शुल्क घेणे किंवा नोकरीसाठीच्या वा आरोग्य व सुरक्षिततेविषयीच्या कायदेशीर बाबींची पूर्तता न करणे, याला प्रतिबंध करणारे धोरण अंगिकारले आहे.

**युएस सरकारला वस्तू आणि सेवांचा पुरवठा करणाऱ्या कंपनीचे कर्मचारी म्हणून सिग्माच्या कर्मचाऱ्यांनी हेच धोरण अवलंबले पाहिजे.**

सिग्मा चे पुरवठेदार आणि सेवापुरवठेदार यांनीही हेच धोरण अवलंबावे यासाठी त्यांना निरंतर प्रशिक्षित करणे याचाही यामध्ये समावेश होतो.



# छळणुकीस प्रतिबंध

**शाब्दिक किंवा अशाब्दिक असा कोणत्याही प्रकारचा छळ सिग्मामध्ये सहन केला जात नाही. जे कंपनीच्या वेळात, आवारात अथवा कंपनीचे काम वा कार्यक्रम सुरू असताना दादागिरी किंवा छळ करतील अशा सर्व कर्मचाऱ्यांना (कंत्राटदारांनासुद्धा) तसेच कर्मचाऱ्यांशिवाय इतरांनाही हे लागू आहे.**




### छळाची उदाहरणे

- भीती दाखवणे
- अपमान करणे
- पदावनती करणे
- दादागिरी करणे
- एखाद्या व्यक्तीला किंवा समूहाला उद्देशून शाब्दिक, अशाब्दिक किंवा शारीरिक अयोग्य वर्तन करणे

दादागिरी वा छळ होत असताना पाहून ज्या कर्मचाऱ्यांना थेट हस्तक्षेप करायला आवडते, त्यांना तसे करण्यास प्रोत्साहन देणे

**ज्यांना दादागिरी किंवा छळ करणारी वागणूक मिळते अथवा ज्यांना ती दिसते, त्यांनी वरती “मदत मागणे” या शीर्षकाखाली सांगितलेल्या मार्गाने त्याची माहिती तत्काळ द्यायला हवी.**

# लैंगिक छळ

**लैंगिक छळ हा लैंगिक भेदभावाचा एक प्रकार असून तो सिग्मा ज्या ज्या ठिकाणी व्यवसाय करते, त्या सर्व ठिकाणच्या कायद्यांनुसार— यामध्ये मेक्सिको व युएसचे संघराज्य व राज्यांचे कायदे आणि भारतीय कायद्यांचाही समावेश होतो— बेकायदेशीर आहे.**

**वेगवेगळ्या देशांमध्ये लैंगिक छळाची व्याख्या थोडी वेगवेगळी असते, परंतु त्यात काही सामाईक विषय असतात.**

साधारणपणे लैंगिक छळ म्हणजे एखादी व्यक्ती ज्या लिंगाची आहे त्याविषयी (यामध्ये त्या व्यक्तीची गर्भावस्था, बाळंतपण, स्तन्यपान किंवा गर्भावस्था यांसंबंधीचे विकार यांचाही समावेश होतो), त्या व्यक्तीचा लैंगिक स्थिती (लैंगिक ओळख, लैंगिक अभिव्यक्ती यांचाही यात समावेश होतो) याविषयी अवांछित वर्तन किंवा छळ. तसेच नकोशी वाटणारी लगट किंवा लैंगिक मर्जीची मागणी किंवा लैंगिक प्रकारचे कुठलेही अवांछित वर्तन यामध्ये गणले जाईल, मग छळ करणाऱ्याचे लिंग कोणतेही असो.

**सामान्यत: समाविष्ट होणारा कुठल्याही प्रकारचा लैंगिक छळ सिग्मामध्ये प्रतिबंधित आहे.**

ज्या कर्मचाऱ्यांना लैंगिक छळ करणारी वागणूक मिळते अथवा ज्यांना ती दिसते, त्यांनी वरती "मदत मागणे" या शीर्षकाखाली सांगितलेल्या मार्गाने त्याची माहिती तत्काळ द्यायला हवी.



# मक्तेदारीला विरोध आणि निकोप स्पर्धा

**युनायटेड स्टेट्स, मेक्सिको, युरोपिअन संघ, युरोपमधील प्रत्येक देश आणि भारत तसेच, स्पर्धेला विरोध करणाऱ्या वर्तनाला प्रतिबंध करणारे वा मक्तेदारीला विरोध करणारे कायदे असणाऱ्या कुठल्याही देशातील तशा कायद्यांचे पालन, सिग्माचे सर्व संचालक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी करावे, अशी अपेक्षा आहे.**

सिग्माच्या उत्पादनांची विक्री करण्याशी संबंधित किंवा आपल्या ग्राहक, स्पर्धक किंवा पुरवठादारांशी संबंध येणाऱ्या सिग्माच्या कर्मचाऱ्यांनी, ते जिथे काम करतात त्या अधिकारक्षेत्रात लागू असलेल्या मक्तेदारीला विरोध किंवा स्पर्धेला मोकळीक देणाऱ्या कायद्यांची माहिती व सवय करून घ्यावी. या संदर्भात आपल्या थेट व्यवस्थापकाकडून किंवा मानव संसाधन विकास (एचआर) विभागाकडून मार्गदर्शन घ्यावे.

## याशिवाय, सिग्माच्या कर्मचारीवर्गाने–

- स्पर्धकांशी संगनमत करणाऱ्या कुठल्याही कृतीत सामील होता कामा नये.
- उघडपणे वा छुपेपणाने विक्रीची किंमत वा इतर अटी ठरवणे, बोली ठरवणे किंवा ग्राहक, विक्रीचा प्रदेश वा उत्पादनांची श्रेणी यांचे वाटप करणे अशा कृतींना मान्यता देता कामा नये.
- विक्रीची किंमत, इतर अटी, विक्रीप्रदेशाच्या सीमा, उत्पादने किंवा यासारख्या विषयांवर, व्यवसाय प्रदर्शन किंवा ग्राहकांसाठीचे उपक्रम अशा अनौपचारिक कार्यक्रमातसुद्धा, स्पर्धकांशी चर्चा करता कामा नये. स्पर्धकाकडून अशा प्रकारची चर्चा करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला स्पष्टपणे जाहीर विरोध करणे आवश्यक राहील.

**एवढे झाल्यानंतर, सिग्माचे कर्मचारी म्हणून तुम्ही, व्यावसायिक स्पर्धेसंबंधीची माहिती तेव्हाच हाताळावी, जेव्हा तुम्हाला खात्री असेल की तुम्ही ती माहिती घेणे आणि तिचा वापर करणे हे कायदेशीर आणि पुढील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणारे आहे –**

- सार्वजनिक स्रोत–जसे प्रकाशित झालेले लेख, जाहिराती, उघडपणे वाटली जाणारी माहितीपत्रके आणि मालकी हक्काविना उपलब्ध असलेले इतर साहित्य याद्वारे माहिती गोळा करणे.
- सरकारी कंत्राटांविषयीची जाहीर न केलेली माहिती गोळा करताना विशेष काळजी घेणे, कारण अशा वेळी तुमच्याकडून किंवा सिग्माकडून कायद्याचे उल्लंघन होण्याची शक्यता असते.
- व्यावसायिक स्पर्धेसंबंधीची माहिती गोळा करताना आपली ओळख कधीही न लपवणे.
- आपले स्पर्धक तसेच इतरांच्या गोपनीय माहितीचा व बौद्धिक संपदा हक्काचा आदर करणे.

# गुणवत्तापूर्ण उत्पादने आणि सेवा

**जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी कौशल्य, अत्याधुनिक उत्पादन, काम करतानाच ते अचूकपणे करण्याची गुणवत्ता आणि जगभरात उत्तम दर्जाची ग्राहक सेवा या सर्वांची आमच्या नावाला साजेशी बेरीज करून आम्ही मूल्यनिर्मिती करतो.**

**पुढील नियम पाळून आपण जे काही करू त्यात सातत्याने गुणवत्ता राखण्याचे उद्दिष्ट आपल्याला साध्य करता येईल**

- आपली उत्पादने आणि सेवा आपल्या ग्राहकांच्या गरजा व अपेक्षा पूर्ण करणाऱ्या असतात याचा अभिमान बाळगावा.
- गुणवत्ता सुधारण्यासाठीच्या आणि उत्पादनांचा व प्रक्रियांचा सुरक्षितरीत्या वापर करण्यासाठीच्या कल्पकतेला प्रोत्साहन देणारे वातावरण जोपासावे.
- सिग्माच्या गुणवत्तेसाठीच्या आवश्यक गोष्टी, प्रमाणीकरण आणि मानके याविषयी कामाच्या ठिकाणच्या प्रत्येक व्यक्तीला माहिती असेल, याची खात्री करावी.
- गुणवत्ता नियंत्रणाकडे दुर्लक्ष करू नये किंवा गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड करावी लागेल, असा कोणताही सोपा मार्ग चोखाळू नये.
- गुणवत्तेच्या किंवा उत्पादनाच्या कुठल्याही नोंदीमध्ये विपर्यास किंवा फेरफार करू नये.
- गुणवत्ता किंवा सुरक्षिततेसंबंधीच्या चिंता/समस्या त्वरित वरिष्ठांना कळवाव्यात.
- आपले पुरवठेदार व विक्रेते यांच्याकडूनही तुल्यबळ गुणवत्तेची उत्पादने मिळवावीत.




**विविध प्रकारच्या गरजा भागवणारी उत्पादने व सेवा पुरवण्यासाठी ग्राहक जिच्यावर विश्वास टाकतील, जिच्याबरोबर व्यवसाय करणे सर्व दृष्टीने हिताचे ठरेल अशी ग्राहकांच्या पसंतीची कंपनी होणे, हे आपले ध्येय आहे.**

# भेटवस्तू, मनोरंजन, लाचखोरी व भ्रष्टाचाराला प्रतिबंध

**भेटवस्तू किंवा खर्चीक मनोरंजन करून नव्हे, तर कर्मचारी, उत्पादने व सेवा यांच्या गुणवत्तेद्वारे व्यवसायात नाव कमावण्याची व त्यासाठी स्पर्धा करण्याची सिग्माची पद्धत आहे.**

भेट म्हणजे कुठल्याही स्वरूपातील मौल्यवान असे काहीही. कर्मचाऱ्याने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या वतीने कुटुंबातील, घरातील वा घरोब्यातील कोणीही रोख रक्कम, भेट प्रमाणपत्र (गिफ्ट सर्टिफिकेट), मेहेरनजर, सेवा, वचन किंवा भविष्यात काहीतरी करण्याचा वायदा देणे किंवा घेणे.

त्या व्यक्तीला कर्मचाऱ्याने, कंत्राटदाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने प्रवास, हॉटेलमधील वास्तव्य, भोजन आणि सांस्कृतिक वा क्रीडा कार्यक्रमाला घेऊन जाणे याचा समावेश मनोरंजनात होतो. कर्मचारी, कंत्राटदार किंवा त्यांचा प्रतिनिधी हा ग्राहकाबरोबर किंवा व्यवसाय मिळवून देणाऱ्याबरोबर न गेल्यास अशा कार्यक्रमाचे तिकीट म्हणजे मनोरंजन न समजता भेटवस्तू असे समजले जाईल आणि तशा प्रकारे ती बाब हाताळली जाईल. भेदभाव न करणारी कंपनी असा जो सिग्माचा लौकिक आहे, त्याला बाधा येईल, असे मनोरंजनाचे मार्ग अयोग्य ठरतील. उदा. फक्त प्रौढांसाठी असलेले मनोरंजन कधीही योग्य ठरणार नाही.

**दुसऱ्या व्यक्तीच्या निर्णयावर प्रभाव टाकण्यासाठी मनोरंजनाचा वापर कर्मचारी आणि त्याच्या प्रतिनिधीने कधीही करू नये.**

सिग्माचे कर्मचारी, कंत्राटदार, दलाल किंवा प्रतिनिधी अथवा सिग्माचे कर्मचारी, कंत्राटदार, दलाल किंवा प्रतिनिधी यांच्या कुटुंबीयांनी पुढील प्रकारच्या भेटी किंवा मनोरंजन देऊ करणे, देणे, पुरवणे किंवा स्वीकारणे या गोष्टी कधीही करू नयेत–

1. रोख रकमेच्या स्वरूपातील भेट किंवा सममूल्य भेट उदा. गिफ्ट कार्ड
2. ग्राहक व्यवहार प्रघाताशी सुसंगत नसलेला किंवा खर्चीक, उधळपट्टी करणारा, महागडा असा भेटवस्तू किंवा मनोरंजनावरील खर्च
3. लाच, मोबदला किंवा टक्केवारी असा अर्थ लावण्याजोगे किंवा तशा हेतूने अथवा व्यावसायिक निर्णयावर अयोग्य पद्धतीने प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने केलेले काहीही
4. कुठलेही कायदे वा नियमांचा भंग करणारे किंवा सिग्माची वा ज्यांच्याशी करार करायचा त्या संस्थेची धोरणे यांच्याशी विसंगत असे काहीही

एखादे कृत्य किंवा वर्तन करण्यासाठी घेणाऱ्यावर प्रभाव टाकणारे किंवा त्याचे बक्षीस म्हणून दिले जाणारे असा अर्थ लावला जाईल व अशा भेटी देण्याची परवानगी **कधीही** देता येणार नाही. घेणाऱ्याच्या व्यावसायिक नीतिमत्तेवर प्रभाव टाकणाऱ्या किंवा तशा वाटणाऱ्या भेटी कधीही योग्य ठरत नाहीत. त्यांच्यामुळे सिग्माच्या कर्मचारी, कंत्राटदार किंवा दलालाला फौजदारी वा नागरी स्वरूपाचा दंड होऊ शकतो.

तथापि, लागू कायद्यानुसार परवानगी असलेल्या, खर्चीक, उधळ्या वा महागड्या नसलेल्या भेटी देण्यास सिग्माची परवानगी पुढील मर्यादित परिघात मिळू शकते.

खाली वर्णन केल्यानुसार, विशिष्ट मर्यादित परिघात, साधी व्यावसायिक भोजने आणि प्रवासखर्च देणे, यासाठी परवानगी

मिळू शकते. या सर्वसामान्य धोरणाला जोडूनच सांगायला हवे की, **साधारणपणे सर्व प्रकारच्या भेटी आणि मनोरंजन सरकारी अधिकाऱ्यांना पुरवण्यास सिग्मा प्रतिबंध करते.** भारतात याला दोन बारीकसे अपवाद आहेत. एक, भारतातील लिखित कायद्यान्वये अधिकृत असलेला आणि दुसरा, कारखान्यांच्या भेटीसंबंधी उद्‌भवू शकणारे विश्वासार्ह व्यावसायिक खर्च. संदर्भासाठी व सोयीसाठी भेटवस्तू, भोजन, मनोरंजन यांची देवाणघेवाण याविषयीची मार्गदर्शक तत्त्वे या धोरणात नमूद केली आहेत.

जर ती भेट (खाली व्याख्या केल्याप्रमाणे) सरकारी अधिकाऱ्याशी (वर ढोबळमानाने व्याख्या केल्याप्रमाणे) संबंधित असेल, तर कर्मचारी, कंत्राटदार व अडत्यांनी इथे सांगितलेल्या धोरण व प्रक्रियांचे पालन करण्याची खबरदारी घ्यावी. यात कसूर झाल्यास शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते. नोकरी जाण्यापर्यंत किंवा निलंबन करण्यापर्यंतची तरतूद यात आहे. कर्मचारी आणि अडत्या आणि सिग्मा कंपनीवरसुद्धा नागरी किंवा फौजदारी कारवाई होऊ शकते.

## सरकारी अधिकाऱ्यांना भेटी देऊ करणे आणि देणे

सिग्माचे कर्मचारी, कंत्राटदार व सिग्माच्या वतीने काम करणारे त्रयस्थ यांनी सर्व आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक लाचलुचपत प्रतिबंधक आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांचे पालन केलेच पाहिजे. सरकारी अधिकारी असो किंवा खाजगी क्षेत्रातील कंपनी वा व्यक्ती, थेट असो वा त्रयस्थ व्यक्तीकडून छुप्या पद्धतीने, सिग्मा सर्व प्रकारच्या लाचखोरीला व भ्रष्टाचाराला प्रतिबंध करते.

सिग्मा सामान्यतः सरकारी अधिकाऱ्यांना थेट किंवा आडवळणाने भेटवस्तू देण्यास प्रतिबंध करते. तथापि, लहानशा प्रतीकात्मक भेटी योग्य ठरू शकतात, जर त्या (i) मागितलेल्या नसतील (ii) रोख रक्कम किंवा समतुल्य किंवा त्याच्याऐवजी वापरण्याजोग्या नसतील (उदा. गिफ्ट सर्टिफिकेट चालणार नाही) (iii) सामान्य दैनंदिनीत मोडत असतील आणि स्वीकारण्याजोग्या असतील जसे दिवाळी किंवा होळी अशा सणांना दरवर्षी बक्षीस म्हणून दिली जाणारी मिठाई (iv) सिग्माच्या स्थानिक पुस्तिकेत नमूद केलेल्या रकमेपेक्षा अधिक खर्चीक नसेल तर.

तरीसुद्धा, नुकत्याच नमूद केलेल्या सामान्य नियमानुसार, व्यवसाय मिळवण्यासाठी किंवा कायम ठेवण्यासाठी किंवा अनुचित फायदा मिळवण्यासाठी सरकारी अधिकाऱ्याने त्याच्या वा तिच्या अधिकारांचा गैरवापर करावा या वाईट हेतूने, कुठल्याही परिस्थितीत, कितीही लहान भेटवस्तू वा मनोरंजन देऊ करणे, देणे, पुरवणे यास बंदी आहे.

सिग्माला खास वागणूक वा फायदा मिळावा म्हणून किंवा तसे पूर्वी केलेले असण्याचा मोबदला म्हणून सरकारी अधिकाऱ्यांना भेटवस्तू देणे, यास या धोरणाअंतर्गत आणि लागू असलेल्या कायद्यांनुसार पूर्णपणे मनाई आहे. कर्मचारी, कंत्राटदार व अडत्यांना वर नमूद केल्याप्रमाणे दैनंदिन पद्धतीनुसार, स्वीकारण्याजोग्या प्रतीकात्मक भेटवस्तू द्यायच्या असतील तर युएस व भारतातील कर्मचारी, कंत्राटदार व आडत्यांनी स्थानिक सर्वोच्च कार्यकारी अधिकाऱ्याकडून लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मेक्सिकोमध्ये कारखाना व्यवस्थापक किंवा मुख्य वित्त अधिकाऱ्याकडून लेखी पूर्वपरवानगी घ्यावी.

युएस, मेक्सिको, भारत किंवा इतर देशांतील लागू कायद्यांनुसार जे बेकायदेशीर पूर्तता असे समजले जाऊ शकेल असे देयक सिग्माच्या कर्मचाऱ्याने उघड किंवा छुप्या मार्गाने देऊ करू नये किंवा स्वतःला माहिती असताना असे होऊ देऊ नये वा त्यात सामील होऊ नये. पुढील गोष्टी विशेषत्वाने प्रतिबंधित आहेत (i) सरकारी अधिकाऱ्याला प्रभावित करण्यासाठी काही देऊ करणे किंवा देणे, (ii) सिग्माच्या वतीने सरकारी अधिकाऱ्याच्या वैयक्तिक प्रभावाचा उपयोग करण्यासाठी काही देऊ करणे किंवा देणे, (i) ज्या व्यवसायातील व्यवहारात सरकारी अधिकाऱ्याची काही भूमिका आहे, त्या व्यवहारात ज्याचा फायदा आहे, अशा व्यक्तीकडून सरकारी अधिकाऱ्याला मौल्यवान वस्तू घेऊ देणे, (iv) आधी सांगितल्यापैकी कुठल्याही कृतीला साहाय्य करणे किंवा प्रोत्साहन देणे. यासंबंधी कुठलेही प्रश्न, अहवाल किंवा स्पष्टीकरण असल्यास, आधीच वरिष्ठांपुढे मांडून कंपनीच्या कार्यकारी समितीतील सदस्याची लेखी स्वरूपात मान्यता घेणे आवश्यक आहे.



# राजकीय आणि दबावाचे कृत्य

**सिग्मा इंजिनीयर्ड सोल्युशन्स नव्या कल्पना आणि मते यांची चर्चा करण्यास पाठबळ देते आणि आपले कर्मचारी बहुश्रुत आणि कार्यमग्न असावेत यासाठी प्रोत्साहन देते.**

सिग्मा इंजिनीयर्ड सोल्युशन्सच्या धोरणानुसार, जगभरातील कोणत्याही प्रदेशात, कंपनीचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी वगळता इतर कोणीही कंपनीच्या वतीने मतप्रदर्शन करता कामा नये.

याशिवाय, अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, कंपनीच्या वतीने मतप्रदर्शन करण्याचा अधिकार, कंपनीच्या हिताच्या दृष्टीने, विशिष्ट व्यक्ती किंवा आस्थापनेला देऊ शकतात.




**जे कर्मचारी राजकीय कारणासाठी पैसा, वेळ आणि श्रम देत असतात, ते त्यांच्या स्वत:च्या इच्छेनुसार हे करत असतात. सिग्मा इंजिनीयर्ड सोल्युशन्स, तिचे कर्मचारी, मालक किंवा संचालक मंडळाच्या मताचे ते प्रतिनिधित्व करत नाहीत.**

# कर्मचाऱ्यांचा खाजगीपणा

**कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या, खाजगीपणाच्या सर्व कायद्यांचे पालन करणे सिग्मासाठी बंधनकारक आहे. कर्मचाऱ्यांची व्यक्तिगत माहिती, सिग्माकडून खाजगी आणि गोपनीय म्हणून जतन केली जाते.**

कर्मचाऱ्यांची नावे, पत्ते, दूरध्वनी क्रमांक, ई–पत्ते, तातडीच्या वेळी वापरण्याचे संपर्क, समान रोजगार संधी, लोकसंख्याशास्त्रीय माहिती, वैद्यकीय माहिती, सामाजिक सुरक्षा क्रमांक, जन्मदिनांक, रोजगार पात्रता माहिती, लाभ योजना नोंदणीची माहिती तसेच कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेल्या लोकांची माहिती व शाळामहाविद्यालय किंवा पात्रता प्रमाणपत्राची माहिती इ. माहितीचा समावेश यात असतो, मात्र तो यापुरताच मर्यादित असेल असे नाही.



कंपनीच्या लाभ योजनेत भाग घेणाऱ्या कर्मचाऱ्याने हे जाणून घ्यावे की, त्याची वैयक्तिक माहिती या योजनेच्या पुरवठादारांना दाव्यांची हाताळणी व कागदपत्रांमधील नोंदीसाठी द्यावी लागते. याव्यतिरिक्त योग्य त्या प्रकटीकरणाच्या गरजांनुसार कायद्यान्वये जी माहिती देणे आवश्यक असेल, ती दिली जाईल.

सर्व कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक माहितीची प्रत्यक्ष कागदपत्रे सुरक्षित वातावरणात जपून ठेवली जातील. ज्यांना ती हाताळणे गरजेचे आहे, अशा विशिष्ट व्यक्तींना ती हाताळण्याची परवानगी असेल. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ठेवलेली माहिती कंपनीच्या मालकीच्या इलेक्ट्रॉनिक आणि इंट्रानेट धोरण व सुरक्षा प्रणालीने सुरक्षित ठेवली जाईल. कायदेशीररीत्या ज्यांना ती हाताळण्याची गरज असेल, त्यांनाच तिच्यापर्यंत पोचता येईल. प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील 1-9 अर्ज आणि वैद्यकीय नोंदी अशा प्रकारच्या माहितीचे जतन इतर माहितीपासून वेगळे, स्वतंत्रपणे केले जाईल.

सर्व कंपनीसंबंधित तक्ते, दूरध्वनी सूची, ई–पत्तागार, कंपनीचा कारखाना आणि भौगोलिक स्थान वा पत्ते ही कंपनीची मालमत्ता आहे आणि ती केवळ अंतर्गत कारणासाठी वापरता येईल. व्यावसायिक कारणांसाठी आवश्यकता भासल्यास, सिग्माचे कार्यकारी नेतृत्व मंडळ, ही माहिती प्रसिद्ध करेल. जिथे सिग्माचे कर्मचारी कार्यरत आहेत, अशा ठिकाणी सिग्मा राष्ट्रीय कायद्यांतर्गत स्थानिक खाजगीपणाचे धोरण जारी करेल.

# आंतरराष्ट्रीय व्यापार नियंत्रण



**सिग्मा ज्या देशांमधून आयात करते, त्या देशांमध्ये लागू होणारे सर्व सीमाशुल्क कायदे आणि आयात नियंत्रण कायदे तसेच निर्यात व पुनर्निर्यात आणि माल, सेवा, तंत्रज्ञान व माहितीच्या हस्तांतरणाचे कायदे यांची परिपूर्ती सिग्माच्या उत्पादनांकडून झाली पाहिजे.**

मालाच्या आयात–निर्यातीस जबाबदार असलेल्या सिग्माच्या कर्मचाऱ्याला, आपण ज्या देशांमध्ये व्यवसाय करतो, त्यांनी कायमच्या व तात्पुरत्या आयात–निर्यातीवर घातलेल्या निर्बंधाविषयी ज्ञान असायला हवे.

# कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण

**सिग्मा इंजिनीयर्ड सोल्युशन्सची मालमत्ता विविध प्रकारची आहे– कारखाने वा उपकरणे यांसारख्या भांडवली किंवा स्थावर मालमत्तेपासून ते संगणक व इतर साधनांसारख्या लहान व आकर्षक जंगम मालमत्तेपर्यंत.**

सिग्माचे कर्मचारी, कंत्राटदार आणि त्रयस्थांनी नेहमीच नुकसान, चोरी वा गैरवापर होण्यापासून कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करावे, अशी अपेक्षा आहे.

**सिग्माच्या मालमत्तेत पुढील गोष्टींचा समावेश होतो, मात्र ते यापुरतेच मर्यादित नाहीत–**

- **भौतिक**– जमीन, इमारती, साधने, संगणक, सर्व्हर, मुद्रणयंत्रे, नेटवर्किंग उपकरणे, वाहने, यंत्रे, इन्व्हेंटरी, कच्चा माल व साठा
- **आर्थिक**– रोख रक्कम, रक्कम येणे असलेली देयके, गुंतवणूक
- **बौद्धिक संपदा**– कंत्राटांचे हक्क व परवाने, व्यापाराची रहस्ये, एकाधिकार, कॉपीराइट आणि व्यवसायाची गोपनीय माहिती
- **डिजिटल**– सॉफ्टवेअर, ई–पत्रे, माहिती (डेटा)



# सायबर जोखीम आणि जबाबदारीने संवाद साधणे

**कंपनीच्या मालकीचे किंवा कंपनीने दीर्घ मुदतीसाठी भाड्याने घेतलेले संगणक, भ्रमणध्वनी वा इतर हाती साधने (डिव्हाइस), नेटवर्क, ई–पत्र सेवा आणि इलेक्ट्रॉनिक माहिती स्रोत यांचा अयोग्य वापर केल्यास ई–विषाणू हल्ले, नेटवर्क प्रणालीसेवा धोक्यात येणे, कायदेशीर समस्या इत्यादींच्या संबंधातील जोखमींना कंपनीला सामोरे जावे लागू शकते.**

व्यक्तींकडून कळत–नकळत, हेतुपुरस्सर वा अनवधानाने घडलेल्या बेकायदेशीर किंवा हानिकारक कृतींपासून कंपनीचे कर्मचारी, कंत्राटदार, भागीदार आणि खुद्द कंपनीचे संरक्षण करण्यासाठी हे धोरण आखलेले आहे.

कंपनीचे कर्मचारी, कंत्राटदार, सल्लागार आणि जे इलेक्ट्रॉनिक स्रोतांचा वापर करतात वा वापर करू शकतात (वापरकर्ते) अशा सर्वांना हे धोरण लागू आहे. यामध्ये कंपनीच्या मालकीचे किंवा कंपनीने दीर्घ मुदतीसाठी भाड्याने घेतलेले संगणक, भ्रमणध्वनी, स्मार्ट वा हाती साधने (डिव्हाइस), नेटवर्क, ई–पत्र सेवा आणि इलेक्ट्रॉनिक माहिती स्रोत यांचा अंतर्भाव होतो. (इलेक्ट्रॉनिक स्रोत)

### वापरकर्त्यांनी खालील मार्गदर्शक तत्त्वे आणि आवश्यक बाबींचे पालन करणे अपेक्षित आहे–

- इलेक्ट्रॉनिक स्रोत, संकेतशब्द (पासवर्ड) किंवा संकेतांक (पिन) वापरून सुरक्षित ठेवावेत तसेच अत्यंत संवेदनाशील किंवा मौल्यवान माहिती एनक्रिप्ट करून ठेवावी, अशी शिफारस कंपनी करत आहे.
- सुरक्षितता आणि देखभालीच्या कारणासाठी कंपनीतील अधिकारी व्यक्तीने कुठल्याही वेळी पूर्वसूचनेशिवाय उपकरणे, प्रणाली व नेटवर्क वाहतूक असे इलेक्ट्रॉनिक स्रोत तपासावे. ई–पत्र, समाजमाध्यमांवरील पोस्टस, संदेश, पटलदृश्ये (स्क्रीनशॉट), छायाचित्रे किंवा इतर पाठवलेले साहित्य वा वापर अशा गोष्टींचा समावेश यात होईल मात्र तो यापुरताच मर्यादित असेल असे नाही.
- इलेक्ट्रॉनिक स्रोतांची ठरावीक काळाने तपासणी करण्याचा आणि या तपासणीतील निष्कर्षांवर आधारित योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार कंपनी राखून ठेवत आहे. सर्व वापरकर्त्यांनी संकेतशब्द सुरक्षित ठेवावेत आणि खात्याचे नाव व संकेतशब्द कोणालाही उघड करून देऊ नयेत. खात्याचे नाव व संकेतशब्द सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी अधिकृत वापरकर्त्यांची आहे. संकेतशब्द निदान तीन महिन्यांतून एकदा तरी बदलायला हवा. कंपनीची प्रणाली तसे करण्यासाठी सूचना देऊ शकेल.

- सर्व संगणक, स्मार्ट वा हाताने वापरायची साधने, अंगणक (लॅपटॉप) आणि वर्कस्टेशन्स यांना संकेतशब्दाचे कुलूप घातलेल्या स्क्रीनसेव्हच्या साहाय्याने सुरक्षित ठेवावे, तसेच 10 मिनिटे किंवा त्याआधी स्क्रीनसेव्हर आपोआप सक्रिय होईल अशी व्यवस्था करावी किंवा वापरात नसताना संगणक बंद करावा.
- वापरकर्त्यांनी सिग्माच्या आंतरजालाशी/ट्रानेटशी/एक्स्ट्रानेटशी किंवा तत्सम प्रणालींशी जोडलेले, वापरकर्त्याच्या वा सिग्माच्या मालकीच्या होस्टसवर, करंट व्हायरस डेटाबेस असलेले अधिकृत व्हायरस स्कॅनिंग सॉफ्टवेअर सातत्याने चालवणे गरजेचे आहे (सिग्माने अधिकृत लेखी परवानगी दिलेले विभागाचे वा गटाचे दुसरे कुठले धोरण नसल्यास). कुठल्याही परिस्थितीत सिग्मामधील इलेक्ट्रॉनिक स्रोतांच्या वापरकर्त्याला, स्थानिक, राज्य, संघराज्य वा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार बेकायदेशीर ठरणारे कृत्य करण्यास परवानगी नाही.
- वापरकर्त्यांनी सिग्माच्या आंतरजालीय सेवा, लागू असलेली सिग्माची आयटी व एचआर धोरणे, ही वर्तनपद्धती तसेच लागू होणाऱ्या सर्व कायद्यांच्या कक्षेत राहून, सुरक्षितपणे आणि जबाबदारीने वापराव्यात.
- वापरकर्त्यांने सिग्मामधील इलेक्ट्रॉनिक स्रोतांमध्ये फेरफार करणे, अडथळा आणणे किंवा गैरवापर करण्यास मनाई आहे.

## आधी सांगितलेले असूनही, वापरकर्त्याने प्रत्येक वेळी खात्री करावी की–

- **अ.** वापरकर्त्यांनी सिग्माचे इलेक्ट्रॉनिक स्रोतध्साधने कधीही खाजगी व्यवहार किंवा व्यावसायिक क्रियाकलापांसाठी वापरू नयेत.
- **आ.** सिग्माच्या नावाचा अनधिकृत वापर किंवा सिग्माच्या कामाशी वा व्यवसायाशी संबंधित नसलेला वापर कुठल्याही संगणकावरून किंवा इतर उपकरणांद्वारे करू नये.
- **इ.** वापरकर्त्यांनी बेकायदेशीर, अयोग्य, अश्लील, बदनामीकारक, मानहानीकारक, धमकी देणारे, शिवराळ, हिंसक किंवा द्वेषमूलक अथवा कंपनीच्या धोरणांशी विसंगत असलेले साहित्य पाठवणे, ध्वनिमुद्रित करणे, वितरित करणे किंवा साठवणे यासाठी सिग्माचे कुठलेही इलेक्ट्रॉनिक स्रोतध्साधने कधीही वापरू नयेत.

वापरकर्त्यांनी सिग्माचे इलेक्ट्रॉनिक स्रोत वापरून बेकायदेशीर, अश्लील आणिध्किंवा भेदभाव करणारे साहित्य बघणे, साठवणे, वितरित करणे किंवा पाठवणे वा ध्वनिमुद्रित करणे यांवर बंदी आहे.

- **ई.** वापरकर्त्यांनी सिग्माचे इलेक्ट्रॉनिक स्रोतध्साधने किंवा कुठल्याही संगणक वा उपकरणांचा वापर करून, कंपनी, कर्मचारी किंवा कंत्राटदारांचे नाव असलेली फसवी आमिषेध्वस्तू वा सेवा पुरवण्याची वचने किंवा खोटी, फसवी वा दिशाभूल करणारी विधाने, दावे वा सादरीकरणे पाठवणे, ध्वनिमुद्रित करणे, वितरित करणे इ. कृती करू नयेत.
- **उ.** वापरकर्त्यांनी सिग्माच्या किंवा त्रयस्थांच्या नेटवर्क, प्रणाली, सेवा किंवा संकेतस्थळासाठी धोकादायक असलेले वा धोकादायक ठरू शकणारे साहित्य पाठवणे, ध्वनिमुद्रित करणे, वितरित करणे किंवा साठवणे यासाठी सिग्माचे कुठलेही इलेक्ट्रॉनिक स्रोतध्साधने कधीही वापरू नयेत. प्रतिबंधित किंवा धोकादायक साहित्यामध्ये व्हायरस, वर्म्स, संकेतशब्द भेदणारे प्रोग्राम किंवा ट्रोजन हॉर्सेस अशा गोष्टींचा समावेश होईल मात्र तो यापुरताच मर्यादित असेल असे नाही.
- **ऊ.** सिग्माच्या किंवा त्रयस्थांच्या मालकीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील गोपनीय माहिती बघणे, बाळगणे, वितरित करण किंवा साठवणे या कृती तशी अधिकृत परवानगी असल्याखेरीज वापरकर्त्यांनी करता कामा नयेत. या विधानातील गोपनीय माहितीमध्ये ग्राहकांच्या याद्या, भविष्याचे भाकीत, विक्रीचे आकडे इ. गोष्टींचा समावेश होईल मात्र तो यापुरताच मर्यादित असेल असे नाही.
- **ऋ.** वापरकर्त्यांनी अधिकृत परवानगीशिवाय, इतरांची संगणक खाती वापरू नयेत किंवा वापरण्याचा प्रयत्न करू नये.
- **ऌ.** ईपत्र पाठवणाऱ्या किंवा अशा एखाद्या व्यक्तीची ओळख विपर्यस्त करू शकणारी कुठलीही कृती वापरकर्त्यांनी करू नये. फसवण्याच्या, रोखण्याच्या किंवा तसा प्रयत्न करण्याच्या उद्देशाने दुसऱ्या व्यक्तीने पाठवलेल्या वा दुसऱ्याच्या संगणकात असलेल्या संदेशात, संप्रेषणात फेरफार करणे किंवा तो हटवणे ह्यांस मनाई आहे.`

# गोपनीय माहिती व बौद्धिक संपदा

## व्यवसायासंबंधीची गोपनीय माहिती आणि व्यावसायिक रहस्ये यांचे संरक्षण करणे हे सिग्माच्या हितासाठी आणि यशासाठी अत्यावश्यक आहे.

**कंपनीची गोपनीय माहिती यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होईल मात्र तो यापुरताच मर्यादित असेल असे नाही—**

- ग्राहकांच्या याद्या, आर्थिक माहिती, प्रलंबित प्रकल्प व प्रस्ताव, किंमत/खर्च आणि कर्मचारी भरपाईची इतर माहिती.
- व्यवसायाची माहिती, धोरण, सध्याच्या किंवा संभाव्य ग्राहकांची यादी, उपकरणे, सॉफ्टवेअर, आराखडे, विक्री, योजना, किंमत यासंबंधीचा डेटा किंवा माहिती
- प्रक्रिया, कल्पना, शोध (एकाधिकार घेण्याजोगे वा इतर), सूचक व सुलभ केलेल्या योजना व इतर तांत्रिक व्यवहार, प्रतिकृती, उत्पादनांची चित्रे (द्विमितीय चित्रे व त्रिमितीय प्रतिकृती, कामगिरीचे तपशील, संकल्पना, प्रगतिपुस्तके आणि
- व्यवसाय करणे व त्याचा विकास यादरम्यानचा किंवा इतर उपयुक्त डेटा वा माहिती

अशी गोपनीय माहिती लिखित, इलेक्ट्रॉनिक, मौखिक, दृश्य, वाचण्यायोग्य स्वरूपात, USB फ्लॅश ड्राइव्हवर, मेमरी कार्डवर, क्लाउडमधील माध्यमावर किंवा इतर कशाही प्रकारे साठवलेली असू शकेल.

कुठलीही खाजगी, गोपनीय वा गुप्त माहिती, प्रक्रियांची माहिती, लेखन, नोंदी, टिपणे, पत्रे, रेखाचित्रे, आराखडे किंवा कर्मचारी असल्याने वा इतर संबंधामुळे उघड झालेला सिग्माच्या मालकीचा कुठलाही डेटा, सिग्माच्या कामाशिवाय इतर कुठल्याही कारणासाठी कर्मचारी, कंत्राटदार आणि अडते यांना वापरण्यास मनाई आहे.

याशिवाय, सर्व कॉपीराइट, केलेली कामे, शोध, नाममुद्रा, व्यवसायाची गुपिते, नवीन कल्पना, सुधारणा, विकास, पद्धती, प्रक्रियांची माहिती, आराखडे, मूल्यमापन, रेखाचित्रे, अहवाल आणि यासारखी अथवा कंपनीचा प्रत्यक्ष वा संभाव्य व्यवसाय, संशोधन व विकास किंवा कंपनीची सध्याची वा भविष्यातील संभाव्य उत्पादने, प्रक्रिया किंवा सेवा याविषयीची माहिती आणि कंपनीचा एखादा कर्मचारी किंवा कंत्राटदाराने त्याच्या/तिच्या नोकरीच्या/कंपनीमधील कामाच्या कालावधीत किंवा कंपनीच्या वेळेत व जागेत, एकट्याने वा इतरांसह कल्पिलेले, विकसित केलेले वा तयार केलेले काम हे डीम्ड वर्क प्रॉडक्ट वा कंपनीने सांगितलेले विशिष्ट काम असते आणि त्यावर कंपनीची मालकी असते. अशा सर्व कामांची कंपनीला तात्काळ माहिती द्यावी आणि कंपनीच्या खर्चाने केल्याच्या विधानाच्या पुष्टीकरणासाठी (मर्यादित नसलेले, नेमून दिलेले काम, मान्यता, मुखत्यारपत्रे व इतर साधने यांसह) सिग्माने सांगितलेल्या सर्व कृती (नोकरीच्या कालावधीत वा त्यानंतर) योग्य रीतीने कराव्यात. तथापि, कंपनीची साधने, माल, सुविधा न वापरता कर्मचाऱ्याने वा कंत्राटदाराने स्वतःच्या वेळात लावलेले शोध या धोरणात सहसा समाविष्ट नसतात.

# हितसंबंधांमधील परस्परविरोध

**सिग्मामध्ये पाळावयाची बंधने आणि कर्मचाऱ्याच्या/व्यक्तीच्या जबाबदाऱ्या यांच्या हितामध्ये विरोध निर्माण होत असेल किंवा तसे भासत असेल तर अशा क्रियाकलापांमध्ये सिग्माचे कर्मचारी, कंत्राटदार आणि त्रयस्थांनी भाग घेऊ नये.**



**सिग्माचे कर्मचारी, कंत्राटदार आणि त्रयस्थांनी पुढील गोष्टींचे पालन करावे—**

- कंपनीच्या हिताच्या किंवा व्यवसायाच्या आड येईल अशा कुठल्याही स्थितीत स्वतःला अडकवून घेऊ नये.
- कंपनीच्या हितासाठी कार्यरत राहण्याची न्यायबुद्धी धोक्यात येईल किंवा धोक्यात येण्याची शक्यता निर्माण होईल अशा परिस्थिती वा कृती टाळाव्यात.
- कंपनीचे द्रव्य आणि मालमत्ता हाताळताना प्रत्येकाने कर्तव्यदक्ष व प्रामाणिक राहावे आणि कुठल्याही प्रकारचा आर्थिक गैरव्यवहार टाळावा.
- कंपनीने मान्यता दिलेले व्यवहार किंवा कृती याशिवाय कुठल्याही कारणासाठी कंपनीच्या मालमत्तेचा वापर करू नये वा तशी परवानगी देऊ नये.
- सिग्माच्या व्यावसायिक हिताशी स्पर्धा करतील अशा कृती करण्यास किंवा सिग्माच्या सेवेत असताना कुठल्याही प्रकारे सिग्माच्या स्पर्धकांसाठी काम करण्यास वा सल्लागार म्हणून काम करण्यास कर्मचाऱ्यांना बंदी आहे. एखाद्या कर्मचाऱ्याला अशा प्रकारचे काम करायचे असल्यास मानव संसाधन विकास विभागाने सिग्माची लेखी पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे.

- कंपनीच्या प्रतिष्ठेला किंवा नावलौकिकाला बाधा येईल किंवा येऊ शकेल अशी कोणतीही कृती (कामाच्या ठिकाणी वा इतरत्र) करू नये. सिग्माशी थेट व्यवहार असणाऱ्या कुठल्याही कंपनीत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्यास वा तशी शक्यता असल्यास सिग्माला पूर्वसूचना देणे, हे त्या व्यक्तीचे कर्तव्य आहे.

- व्यावसायिक किंवा वैयक्तिक लाभ मिळवण्याच्या उद्देशाने सिग्माचे कंत्राटदार, उपकंत्राटदार, सल्लागार, विक्रेते, पुरवठेदार, स्पर्धक किंवा ग्राहक यांच्याकडून कुठलीही लाच, टक्केवारी, भेटी, मनोरंजन किंवा इतर काही भरपाई वा फायदा (आर्थिक किंवा इतर स्वरूपातील) घेणे, देऊ करणे, देणे किंवा प्राप्त करणे या गोष्टी करू नयेत. तसेच अशा प्रकारचे व्यवहार सरकारी अधिकाऱ्यांसहित कुठल्याही त्रयस्थांशी करू नयेत.

- सिग्माच्या वतीने, कुटुंबीय किंवा मित्रमंडळीबरोबर व्यवसाय करणे शक्य तितके टाळावे. एखाद्या व्यक्तीचे कुटुंबीय, मित्रमंडळी यांना फायदा होईल आणि/किंवा सिग्मामधील कर्तव्य व जबाबदारीला बाधा येईल अशा कृती करणे प्रतिबंधित आहे.

- कर्तव्यात हयगय किंवा सिग्माशी संबंधित असल्यामुळे मिळणाऱ्या व्यावसायिक संधींचा दुरुपयोग करणारे किंवा असा दूरान्वयेही अर्थ होऊ शकणारे वर्तन/कृती करू नये.



# प्रत्येकाची जबाबदारी

**नैतिकदृष्ट्या योग्य आणि बेकायदेशीर वर्तनापासून मुक्त असलेले वातावरण निर्माण करणे हे प्रत्येक कर्मचाऱ्याचे, कंत्राटदाराचे व त्रयस्थाचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे. आपल्यापैकी प्रत्येकजण योग्य निर्णय घेण्यास आणि आपण ज्यासाठी वचनबद्ध आहोत, त्या आदर्शाशी प्रतारणा होत असल्यास त्याची माहिती देण्यास सक्षम आहे.**

या नैतिकतेच्या संकेतांचे पालन करण्यासंबंधी किंवा नैतिकदृष्ट्या योग्य निर्णय घेण्यासंबंधी काही प्रश्न असतील तर व्यवस्थापनाशी किंवा मानव संसाधन विकास विभागाशी चर्चा करण्यास संकोच करू नका.

नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांनी दर वर्षी त्यांच्या माहितीनुसार या संकेतांचे पालन करत असल्याचे, त्यांचे उल्लंघन करत नसल्याचे वा तसा संशय नसल्याचे, तसे पूर्वी सांगितले नसल्याचे आणि या संकेतांचे उल्लंघन ठरू शकेल असे काहीही करण्यास सांगितले गेले नसल्याचे जाहीर करणे आवश्यक आहे.

बोलून दाखवणे नेहमीच सोपे नसते, परंतु चिंता व्यक्त करण्यामुळे तुम्ही, तुमचे सहकारी आणि सिग्माचे नुकसान होणे टळते आणि जागतिक स्तरावर आपली प्रतिष्ठा कायम राहण्यास मदत होते. तुमचा आवाज ऐकला जावा यासाठी आपल्या साधनांचा वापर केल्यास तुम्हाला सशक्तपणाचा अनुभव येईल आणि सिग्मा नेहमी तुमच्याबरोबर असेल याची खात्री बाळगा.



# प्राप्ती आणि पोचपावती


**मला सिग्मा इंजिनीयर्ड सोल्युशन्सचे नैतिकतेचे संकेत आणि व्यावसायिक वर्तन/आचरणाचे नियम याची प्रत मिळाली आहे.**


***मी हे संकेत वाचले आणि समजून घेतले असून त्यांचे पालन करीन.***

यातील तत्त्वे आणि आदर्श जाणून घेऊन त्यांचे पालन करण्याची जबाबदारी प्रत्येक कर्मचारी, कंत्राटदार व त्रयस्थ यांची आहे, हे मला समजले आहे. या संकेतांचे उल्लंघन केल्यास सुधारणा करण्यासाठीची कारवाई होऊ शकते आणि त्यामुळे दंडात्मक कारवाईही होऊ शकते, याची मला कल्पना आहे.

ज्याची माहिती पूर्वी मी दिलेली नाही, असे कोणतेही या संकेतांचे उल्लंघन करणारे कृत्य मी केलेले नाही, याची मी इथे स्वाक्षरी करून पुष्टी करत आहे.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी** | |
| **नाव** | |
| **स्थान** | |
| **दिनांक** | |









SIGMA®
ENGINEERED SOLUTIONS

120 Sigma Drive
Garner, NC 27529
919-773-0011
www.sigmaengineeredsolutions.com